# अर्पण फाउंडेशनचे व्यसनमुक्ती केंद्र

गेल्या वर्षी महाराष्ट्र फाउंडेशनने महाराष्ट्रातील प्रख्यात तरुण सामाजिक कार्यकर्ते डॉ. आनंद बंग आणि सौ. पल्लवी व श्री. कौस्तुभ आमटे यांना अमेरिकेत आमंत्रित केले होते. दिवाळीच्या कार्यक्रमासाठी ते न्यू यॉर्कला आले असता त्यांच्या प्रत्यक्ष परिचयाने प्रभावित होऊन मी महाराष्ट्रातील त्यांच्या कार्यस्थळांना भेट देण्याची इच्छा व्यक्त केली व त्यांनीही आनंदाने होकार दिला. गेल्या महिन्यात कुटुंबियांसमवेत भारतात जाण्याचा योग आला. आधीपासूनच आनंदवन व गडचिरोली येथे जाण्याच्या तारखा ठरविल्या, बुकिंगही केले, पण अचानक काही घरगुती अडचणी उद्भवल्यामुळे मुंबई सोडून जाणे अशक्य झाले.

आनंदवन व गडचिरोलीला जाता आले नाही याची जरी खंत वाटली तरी मुंबईपासून दूर जाऊ न शकल्याचा एक अप्रत्यक्ष फायदा म्हणजे एका आगळ्या-वेगळ्या सामाजिक कार्याला वाहून घेतलेल्या व्यक्तीचा परिचय झाला. डॉ. आशिष देशपांडे हे मुंबईजवळच सफाळे या गावात गेली १० वर्षे ‘अर्पण व्यसनमुक्ती केन्द्र’ चालवत आहेत. मी आणि माझी पत्नी उत्पलाने या केंद्राला भेट द्यायची ठरवली आणि एक दिवस डॉ. देशपांडे यांच्यासमवेत सफाळ्याला जायला निघालो. मुंबईपासून जवळपास दोन तासांचा प्रवास होता. माझ्या उत्सुक स्वभावामुळे मी डॉक्टरांची मुलाखतच घ्यायला सुरवात केली. त्या दोन तासांच्या प्रवासात डॉक्टरांबद्दल आणि त्यांच्या कार्याबद्दल बरीच माहिती मिळाली. त्या प्रवासात केलेल्या गप्पागोष्टींमुळे आम्ही दोघं तर नक्कीच प्रभावित झालो आणि म्हणूनच ती माहिती तुमच्यापर्यंत पोचावी यासाठी हा प्रयत्न.




महाराष्ट्राला सामाजिक कार्य व कार्यकर्त्यांची गौरवशाली परंपरा आहे. समाजातील दीन, दुर्बल घटकांसाठी अनेकजण आपापल्या परीने यथाशक्ती प्रयत्न करीत असतात. नैसर्गिक आपत्ती, सामाजिक विषमता, परंपरागत अन्याय यांची शिकार झालेल्यांच्या मदतीसाठी आज अनेक संस्था व व्यक्ती पुढे सरसावताना दिसतात. पण ज्यांनी व्यसनांच्या नादी लागून आपल्या आयुष्याचा खेळखंडोबा करून घेतला आहे अशांचे काय? जरी हे लोक

स्वतःच आपल्या दुःस्थितीला जबाबदार असले तरी त्यांनाही मदतीची आवश्यकता असतेच. व्यसनग्रस्तांसाठी तळमळीने काम करणाऱ्यांची संख्या कमी आहे, आणि म्हणूनच डॉ. देशपांडे यांच्या कार्याचे विशेष अप्रूप वाटते.

डॉ. देशपांडे हे मानसरोगतज्ञ आहेत. कॉलेजात शेवटच्या वर्षात असताना त्यांचा व्यसनमुक्ती ट्रीटमेंटशी संबंध आला आणि तेव्हाच त्यांनी कॉलेजमधून मेडिकलची पदवी मिळवल्यावर आपल्या दररोजच्या कामाबरोबरच हे समाजकार्यही हाती घ्यायचे मनाशी ठरवले. व्यवसायाला सुरवात केल्यावर लवकरच त्याना एका श्रीमंत पण व्यसनाने पछाडलेल्या रुग्णावर उपचार करावा लागला. डॉक्टरांनी आत्मविश्वासाने आणि जिद्दीने त्या रुग्णाची लवकरच त्या त्रासातून मुक्तता केली. याचा आनंद डॉक्टरांबरोबर त्या पेशंटलाही झाला व त्याने "माझ्यासारख्या अनेक रुग्णांना तुम्ही या त्रासातून नक्कीच वाचवू शकता आणि या कार्यात मी तुम्हाला मदत करेन" असे आश्वासन दिले. डॉक्टरांनीही या पेशंटच्या मदतीने हे कार्य हाती घ्यायचं ठरवलं.

आता हे ठरवलं खरं, पण नुकत्याच कॉलेजमधून पदवी घेतलेल्या डॉक्टरला आर्थिक साह्य कोण करणार हा गहन प्रश्न उभा राहिला. पण सुदैवाने काही समविचारांचे मित्र डॉक्टरांच्या मदतीला आले आणि थोडासा निधी उभारला. पण एवढ्याशा निधीत मुंबईत अर्धी खोलीसुध्दा घेणं शक्य होणार नव्हतं. तेव्हा त्यांनी मुंबईपासून २ तासांवर असलेल्या सफाळे गावात छोटीशी जागा घेऊन 'अर्पण फाउंडेशन' या संस्थेची स्थापना केली.



गेल्या दहा वर्षात आपल्या अथक प्रयत्नांनी त्यांनी अर्पण फाउंडेशनचा व्याप बराच वाढवला आहे. तिथे आता शंभरच्यावर रुग्ण ट्रीटमेंट घेत आहेत. पण यात सर्वात महत्त्वाची आणि अतिशय कुतूहल वाटावे अशी गोष्ट म्हणजे या संस्थेत ट्रीटमेंट घेऊन बरे झालेले रुग्णच तिथे नवीन रुग्णाना Counseling करतात. रुग्णांना राहण्यासाठी स्वतंत्र खोल्या व डॉर्मिटरीची व्यवस्था आहे. श्री. जर्नेल सिंग हे कार्यकारी विश्वस्त संस्थेच्या दैनंदिन कामकाजावर देखरेख ठेवतात.

तिथल्या एका कौन्सलरशी गप्पा मारताना त्यांनी या संस्थेची आणि त्यांच्या तिथल्या कार्याची माहिती दिली. डॉक्टर देशपांडे यांच्या मदतीने आणि ट्रीटमेंटने हे रुग्ण नुसतेच व्यसनमुक्त झाले नाहीत, तर त्यांच्या तेजस्वी विचारांनी खूपच प्रभावित झालेलेही जाणवले. त्यांच्या मते ते स्वतः या त्रासातून मुक्त झाल्यामुळे त्यांना

नवीन आलेल्या रुग्णांची व्यथा उमजते आणि Counseling करताना ते त्यांना समविचाराने समजावू शकतात.

डॉ. देशपांडे संस्थेला आता आठवड्यातून एकदाच भेट देतात आणि सगळ्या रुग्णांची विचारपूस करून त्यांना लागेल ती ट्रीटमेंट देतात. डॉ. देशपांडेंच्या अनुपस्थितीत जर वैद्यकीय सेवेची गरज लागली तर सफाळे गावातील डॉक्टर मदतीला येतात. पण संपूर्ण संस्थेचा व्यवहार आणि दररोजचा हिशोबसुद्धा हे कौन्सलरच सांभाळतात. त्यांनी अतिशय काटेकोरपणे पै न पैचा लिहिलेला तो हिशोब पाहून तर आम्हाला त्यांचे खूपच कौतुक वाटले. एवढंच नव्हे तर दैनंदिन जेवणासाठी लागणाऱ्या भाजीपाल्यासाठी छोटीशी शेतीही हीच मंडळी करतात. डॉ. देशपांडेनी त्यांना फक्त व्यसनमुक्तच नव्हे तर स्वयंसिध्दही केले आहे.



समाजाने दुर्लक्ष केलेल्या आणि त्यांच्या वाईट सवयींमुळे दूर केलेल्या या व्यक्तींना डॉ. आशिष देशपांडेनी आपले म्हटले, त्यांच्यावर विश्वास ठेवला आणि समाजसुधारणेचे हे मोठे कार्य कुठलीही अपेक्षा न ठेवता सातत्याने चालू ठेवले. नुसते व्यसनांतून मुक्त केले नाही तर त्यांच्यातूनच सामाजिक कार्यकर्त्यांची दुसरी फळी निर्माण केली. केवळ हेच कार्य नव्हे तर डॉ. देशपांडेनी आता अनेक नवीन सामाजिक उपक्रम हाती घेतले आहेत. त्यांच्या या थोर कार्याला माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा.

तुम्ही जर मुंबईला प्रवास करणार असाल तर वेळात वेळ काढून डॉ. देशपांडेंना आणि त्यांच्या या संस्थेला नक्कीच भेट द्या, आणि त्यांच्या उपक्रमांना प्रोत्साहन द्या ही माझी तुम्हाला नम्र विनंती. डॉ. देशपांडेंशी तुम्ही doc_ashishd@yahoo.com या पत्त्यावर संपर्क साधू शकता.

**अनिरुद्ध किनरे, न्यूयॉर्क**

anidudha@kinare.com